**Sandhya, August 26, 2011**

# 'टीसीएस आयटी विझ २०११' पुणे फेरीचे विजेतेपद आर्मी पब्लिक स्कूलकडे

**पुणे, सं.प्र. :**

टाटा कन्सलटन्सी सर्व्हिसेसने (टीसीएस) आयोजित केलेल्या 'टीसीएस आयटी विझ'च्या ट्रॉफीवर अवघड फेऱ्या पार करून आर्मी पब्लिक स्कूलच्या ग्यानेंद्र मिश्रा व एस. शिराज यांनी आपले नाव कोरले. ट्रॉफी व्यतिरिक्त या दोघांनाही प्रत्येकी एक एक गॅलेक्सी टॅबलेट व डिजिटल कॅमेरा बक्षीस म्हणून देण्यात आला.



मॉर्डन ज्युनिअर कॉलेजच्या तनय चांदकर व निषाद डावखर यांनी उपविजेतेपद पटकावले. या स्पर्धेत पुण्यातील ४५ शाळांमधील ८५० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते.

स्पर्धेचे पारितोषिक वितरण मंगळवारी यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे शिरीष गोडबोले, ए. सहस्त्रबुध्दे, अरविंद पाध्ये आणि हॅरीन विन यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी अंतिम फेरीत पोहचलेल्या सहा संघांना टीसीएसकडून बक्षिसे देण्यात आली.